# नि.क्र. ३७ खालील आदेश नि.दि.मु.नं. ०३/२०१६

०१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः-

सदरचा दावा वादींनी प्रतिवादीं विरुध्द अतिक्रमीत जमीन ताब्यात मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. सदर दावा दाखल झाल्यानंतर कोर्ट कमिश्नर यांची नेमणुक होवुन वादमालमत्ता शेत गट नं. ४५/३ ची मोजणी केली असुन अहवाल दाखल केलेला आहे. सदर अहवालामध्ये वादी याच्या मालकीच्या शेतजमनीवर ० हे. ३१ आर एवढ्या क्षेत्रावर प्रतिवादी यांनी अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे, त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्यामध्ये अर्जात नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी सदर अर्ज दाखल केलेला आहे.

०३. सदरील दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्तीमुळे वादी कोणतीही नवीन केस निर्माण करत नाही वादी व प्रतीवादी यांच्यातील वादाचे अंतीम निराकरणासाठी सदर दुरुस्ती आवश्यक आहे. सदर दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे अर्जावर दिले आहे. तिव्र आक्षेप नोंदविला आहे.

०५. अर्ज व त्यावरील शपथत्राचे अवलोकन करुन तसेच वादी यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून असे दिसून येते की, दावा वादींनी प्रतिवादीं विरुध्द अतिक्रमीत जमीन ताब्यात मिळण्याबाबत दाखल केलेला आहे. वादींनी सदरची दुरुस्ती ही दावा प्रलंबित असताना मिळालेल्या माहितीच्या कारणास्तव करणे गरजेची आहे. तसेच ती तांत्रिक स्वरुपाची आहे. सदर दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी व वादी,

प्रतिवादीमधील वादाचे कायमचे निराकरण होण्यासाठी मदत होणार आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने अर्जात मागितलेली दुरुस्ती करण्यास परवानगी देणे उचित आहे. सबब मी खालील आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी नि.क्र. ३७ वरील अर्जात मागितलेली दुरुस्ती आदेश तारखेपासून १४ दिवसांमध्ये करावी.

०३. वादींनी खर्चाची रक्कम रुपये १००/–(रुपये शंभर फक्त) प्रतिवादींना देण्यात यावी.

Digitally signed by PRUTHAVI SANJAY PATIL
Date: 2023.06.10 16:44:36 +0530

( पी. एस.पाटील )

दिनांकः १०/०६/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उमरखेड

**नि.क्र. ३७** **नि.दि.मु.नं. ०३/२०१६**

**<u>प्रमाणपत्र</u>**

याद्वारे मी असे प्रतिपादन करतो की, वरील आदेश व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यातील सर्व मजकुर मूळ न्यायनिर्णयाशी तंतोतंत बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| आदेशाचा दिनांक | : | १०/०६/२०२३ |
| आदेश स्वाक्षांकित दिनांक | : | १०/०६/२०२३ |
| लघुलेखकाचे नाव | : | य.वि.पोरकुटे, लघुलेखक (श्रेणी–३) |
| आदेश अपलोड केल्याचा दिनांक | : | १२/०६/२०२३ |